माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

---

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

### अपील क्रमांक : १३८८/२०२२

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. सुरेश प्रभाकरराव जयस्वाल, रा. अंबाडा वार्ड, रामटेक, ता. रामटेक जि. नागपूर | उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक विभाग, रामटेक, ता. रामटेक जि. नागपूर | अपर पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा(ग्रामीण), नागपूर |

### सुनावणी दिनांक :- १४.११.२०२४

१. उपस्थिती —

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| अनुपस्थित | उपस्थित | अनुपस्थित | उपस्थित (प्रतिनिधी) | अनुपस्थित |

२. व्दितीय अपील अर्ज —

(१) **व्दितीय अपील अर्जाचा दिनांक** : २४.०५.२०२२

(२) **व्दितीय अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक** : २४.०५.२०२२

(३) **व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे** : अपिलार्थी ने माहितीचा अधिनियम,२००५ च्या तरतुदीप्रमाणे सर्वप्रथम दि. २३.११.२०२० प्रमाणे त्यात नमुद केलेली तीन मुद्यावरील माहिती श्री. राजेंद्र चव्हाण, जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग, रामटेक यांचे कार्यालयातून मागितली होती. त्यात मुद्दा क्र. १ प्रमाणे मागितलेली माहिती दि. १८.११.२०२१ चे रात्री १२.०० वाजेपासून ते २२.११.२०२१ रात्री १२.०० वाजेपर्यंतचे संपूर्ण कालावधीचे सि.सि.टीव्ही कॅमराचे फुटेजची प्रत मला देण्यासाठी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयीन पत्र क्र. आरडी/मा.अ.अधि/२८५९/२०२१ दि. ११.१२.२०२१ मध्ये नमुद कारणांसाठी म्हणजे मागितलेली सि.सि. टीव्ही फुटेज ची प्रत पोलीस स्टेशन अभिलेखावर उपलब्ध नाही तसेच कलम ८ (१) (ज) जनमाहिती अधिकारी अधिनियम २००५ प्रमाणे नाकारण्यात येत आहे, अशी सबब पुढे करून ती मला माहिती देण्यासाठी टाळाटाळ करण्यात आली.

(४) **व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती** : दि. १८.११.२०२१ चे रात्री १२.०० वाजेपासून मे २२.११.२०२१ रात्री १२.०० वाजेपर्यंतचे संपूर्ण कालावधीचे पूर्वीचे व त्या कालावधी नंतरचे कोणत्या तारखेपर्यत चे सि.सि.टीव्ही फुटेज आपल्या पोलीस स्टेशन ला उपलब्ध आहे? ते उपलब्ध असल्यास ते फुटेज मला देण्यात यावी व नसल्यास त्याची कारणे देऊन त्या बद्दलची सुद्धा संपूर्ण माहिती मला देण्याची कृपा करावी, अशी विनंती केली आहे.



राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

**माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : २०.१२.२०२१

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २१.१२.२०२१

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : दि. १८.११.२०२१ चे रात्री १२.०० वाजेपासून ते २२.११.२०२१ रात्री १२.०० वाजेपर्यत तसेच कॉलम नं. ३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे चा कालावधी

(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती : पोलीस स्टेशन रामटेक, मधील सर्व सि.सि.टीव्ही कॅमेराचे दि. १८.११.२०२१ चे रात्री १२.०० वाजेपासून ते २२.११.२०२१ रात्री १२.०० वाजेपर्यंतचे संपूर्ण कालावधीचे सि.सि.टीव्ही. कॅमेराचे फुटेजची प्रत मी माझ्या दि. २३.११.२०२१ रोजीच्या माहितीचा अधिकार कायद्यातील तरतुदीप्रमाणे केलेल्या अर्जाप्रमाणे मागणी केली असता माननीय जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, कामठी विभाग, कामठी, अतिरिक्त कार्यभार, रामटेक विभाग कार्यालय उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक, विभाग रामटेक यांचे दि. ११.१२.२०२१ चे कार्यालयीन पत्र क्रमांक आरडी/मा.अ.अधि/२८५९/२०२१पत्रानुसार रामटेक पोलीस स्टेशनमध्ये उपलब्ध नसल्याचे मला कळविण्यात आले.

(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : जनमाहिती अधिकारी यांनी दि. ०८.०१.२०२२ रोजी अपिलार्थी यांना तीन मुद्यांची माहिती दिली. ती खालीलप्रमाणे-

१. मुद्दा क्र १ ची माहिती पोलीस स्टेशनच्या अभिलेखावर उपलब्ध नाही. यांचे कारण संबधीत कार्यालयास मागविण्यात यावे.

२. मुद्दा क्र. २ ची माहिती कलम ८ (१) (ज) माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये नाकारण्यात येत आहे.

३. मुद्दा क्र. ३ ची माहिती कलम ८ (१) (ज) माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये नाकारण्यात येत आहे.

**३. प्रथम अपील –**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : २८.०१.२०२२

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १०.०२.२०२२

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : माहिती देण्यासाठी टाळाटाळ करण्यात आली.

(४) अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : प्रथम अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर यांनी दि. २५.०२.२०२२ रोजी सुनावणी घेतली. त्यानुसार सदर प्रथम अपिल सुनावणी प्रकरणात अपिलार्थी यांनी पो. स्टे. रामटेक येथील सि.सि.टि.व्ही. कॅमेराचे फुटेज मागणी केलेले आहे, सदर कॅमेरे हे पो. स्टे. रामटेक च्या सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने लावण्यात आले असल्यामुळे, तसेच अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती सार्वजनिक हिताच्या दृष्टीने मागणी केली असल्याबाबत वाजवी कारणे दिसून आली नाही. त्यामुळे सहा. माहिती अधिकारी तथा ठाणेदार रामटेक यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना कलम ८ (१) मा.अ.अधी अन्वये नाकारली असून, तसेच उत्तर जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग यांनी अपिलार्थीस दिलेले आहे. जनमाहिती अधिकारी यांच्या निर्णयाशी आम्ही सहमत आहेत, असा निर्णय पारित केला.



राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

४. **युक्तीवाद/लेखी खुलासा** — आज सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित असून, जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक विभाग, श्री. रमेश बरकते उपस्थित असून प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या तर्फे श्री. विनोद सरोदे,सहा. फौजदार, अप्पर पोलीस अधीक्षक, जिल्हा नागपूर (ग्रामीण), नागपूर उपस्थित आहेत. अपिलार्थी, श्री. जयस्वाल यांनी पोलीस स्टेशन रामटेक मधील दि. १८.११.२०२१ रोजीच्या रात्रीचे ते दि. २२.११.२०२१ रोजीच्या रात्रीचे सी.सी.टी.व्हि. कॅमेराचे फुटेजची माहिती मागितली. तत्कालिन जनमाहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनिमय कलम ८ (१) (ज) नुसार मुद्दा क्र. २ व ३ ची माहिती नाकारली असून मुद्दा क्र. १ ची माहिती उपलब्ध नसल्याने अपिलार्थीस पुरविण्यात आली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिल आदेशात, जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाशी सहमती दर्शविली आहे.

प्रत्येक पोलीस स्टेशनमधील सी.सी.टी.व्हि. कॅमेरामध्ये तेथील सर्व दैनंदिन कामाकाजाचे रेकॉर्ड जतन होतात. तसेच इतर गुन्हाचे, आरोपीचे रेकॉर्ड होते. पोलीस स्टेशनमधील दैनंदिन कामकाज, पोलीस स्टेशनला आलेले सर्व तक्रारदार तसेच येणारे जाणारे इतर तक्रारदाराची नोंद असते. त्यामुळे पोलीस स्टेशनमधील रेकॉर्ड सार्वजनिक सुरक्षिततेतच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे असते.

५. **निष्कर्ष** — सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रांवरून आयोग खालील निष्कर्षापत येत आहे.

१) अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी योग्य प्रतिसाद दिल्याचे आढळून येते.

२) तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला आदेश सुद्धा योग्य असल्याचे दिसून येत असून अपिल निकाली काढणे संयुक्तिक आहे.

सबब , खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

**प्रस्तुत अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग ★ नागपूर ★ सत्यमेव जयते

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १४.११.२०२४**

जावक क्रमांक 250 दिनांक 13 JAN 2025